

झुक झुक आगगाडी कशी सुसाट निघाली
आकाशात झूम झुई उंच-उंच उडाली

तारकपूर आहे चंद्रपुरीच्या जवळ
दिवाळीच्या सुट्टीमधे लांब निघाली सहल

दिवाळी विशेषांक

ऑक्टो-नोव्हें २०२२

Pune, Vol.: 4, 7th Issue, Oct/Nov 2022 (Monthly), Price: ₹ 200/- Pages: 68



ढगेवाडी, चंद्रपुरी, आणि चांदणपूर
स्टेशने गेली मागे आणि आले तारकपूर

आगळे–वेगळे प्राणी, डोक्यावर शिंग एक
मोठे जांभळे डोळे, भाषा बोलती अनेक


मित्र मिळाले नवीन, दंगा मस्ती खूप केली
खेळ शिकलो नवीन, त्यांना लंगडी शिकवली

घरोघरी होते तिथे एक लहानसे यान
बाहेर जायचे कुठेही यानात बसून छान

जादूच्या भांड्यामध्ये मागू तो खाऊ मिळे
मागितला फराळ सारा लाडू, बर्फी, कडबोळे

झूम झूम दिवाळी

कविता- विद्याधर शुक्ल | चित्र - भक्ती दलाल



यानातून सारेजण लांब लांब भटकलो
चांदण्यांच्या गावातून रात्री हिंडलो खेळलो

येताना जादूची कांडी बक्षीस मिळाली.
शंख, शिंपले, खेळणी आम्हीपण भेट दिली

सुटी संपली, निघालो, गाडीतून टाटा केला
हिप हिप हुर्रे, झूम झुई, आलो आमच्या गावाला

प्रिय आई-बाबा

चिकूपिकूचा हा चौथा दिवाळी अंक. या वेळी प्रवास हा विषय घेऊन आलो आहोत. मुलांना प्रवासाचं आकर्षण खूप असतं. सतत नावीन्याची गरज असलेला त्यांचा मेंदू, दिसेल ती गोष्ट टिपून घेत असतो. एकंदर प्रवासातली गंमत, मजा, सहप्रवासी, अडचणी, रोमांच आणि आनंद हे सगळंच नंतर खूप काळ ऊर्जा देत राहतं.

आपल्या प्रत्येकाचा आई-बाबा हा प्रवास काही वर्षांपूर्वी सुरु झाला आणि आपल्या आत लपलेला एक कप्पा उघडला. कधीच कोणाबद्दल वाटली नसेल अशी भावना तो चिमुकला हात पकडल्यावर निर्माण झाली. या प्रवासात आनंद आहे, समाधान आहे, पण तसंच अनेक परीक्षा आहेत. काही अडथळे आहेत. पालकत्वाच्या या प्रवासाचा पल्ला मोठा आणि खूप काही शिकवणारा आहे.

मुलांचाही स्वतंत्र प्रवास सुरु आहे. पहिली आठ वर्ष ही त्यांची घरट्यात राहायची, अनुकरणातून आणि अनुभवातून शिकण्याची आहेत. प्रेम, आनंद, सुरक्षितता, विश्वास, आशा हे सगळं त्यांच्या पंखातली शक्ती वाढवणारं आहे. त्यांना समृद्ध करणारे अनुभव देत राहणं खूप महत्त्वाचं आहे.

या अंकातली चिकूपिकू एक्सप्रेसची ही सफर नव्या, जुन्या, अनोळखी, धमाल ठिकाणी आपल्याला घेऊन जाणार आहे. सिंदबादची सफर, परग्रहावरची सहल अशा फँटसीज आहेत. एखाद्या वस्तूचा आपल्यापर्यंत पोहोचण्याआधी कसा प्रवास होतो त्याची गंमत आहे, वेगवेगळ्या वाहनांच्या गोष्टी आहेत, भरपूर कोडी आणि खेळ आहेत, चित्रांच्या, रंगवण्याच्या ॲक्टिव्हिटीज आहेत आणि 'गाडी आली.. गाडी आली' सारखी ठेक्यात म्हणता येतील अशी गाणीही आहेत. या गाडीत मुलांचा हात धरून आपणही चढलो आहोत. एकत्र गोष्टी वाचू, गप्पा मारू, चित्रं काढू, रंगवू, हातांनी वस्तू बनवू, मस्ती करू, मजा करू! खरं तर आपण सगळेच एकाच गाडीतून जाणारे सहप्रवासी आहोत. एकत्र मिळून आपल्यासाठी आणि मुलांसाठी या प्रवासातल्या गोड आठवणी साठवून ठेवू या. तुम्हाला सगळ्यांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!

अमृता कावणकर
Editor & Co-Founder

जुई चितळे
Co-Editor

'मूल' प्रश्न

सात वर्षांची हर्षा आणि तिची आई काय बोलताहेत?

- **डॉ. श्रुती पानसे,** बालशिक्षणतज्ज्ञ

हर्षा : मला तुझ्यासारखं चित्र काढताच येत नाही. आई, तूच काढ चित्र.

आई : का गं ? छान आहे की हे चित्र.

हर्षा : नाहीये छान. ते काल आपल्याकडे आलेले काका म्हणाले की हे घर वाटतच नाहीये आणि आकाशातली चांदणी पण चांदणीसारखी वाटत नाहीये. मग त्यापेक्षा तूच काढ चित्र.

आई : अगं, त्या काकांच्या नीट लक्षात आलं नसेल. पण मला माहितीये ना... तू घर काढायचा छान प्रयत्न करते आहेस. बघ बरं, पुन्हा काढून.

(नवीन चित्र काढल्यावर...)

आई : तूच सांग, कसं झालंय हे चित्र?

हर्षा : म्हणजे... मला अजून नीट जमलं नाहीये...

आई : काल काढलेलं चित्र याच्या शेजारी ठेवून बघ. आता सांग, कोणतं चित्र जास्त छान आहे? कोणतं चित्र तुला आवडलं ?

हर्षा : हे आवडलं. आज काढलेलं.

आई : बरोबर ! कालच्यापेक्षा हे जास्त छान आलं आहे. पुन्हा उद्या पण काढून बघितलं तर कदाचित अजून छान आलेलं असेल.

आपले शब्द मुलांसाठी खूप महत्त्वाचे असतात. कसं बोलू या मुलांशी, हे सांगणारा हा छोटासा प्रसंग.

Published by:
OneZeroEight Learning Pvt Ltd.
Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor,
Hingne Kh., Sinhagad Road, Pune 411 051

Printed by:
Atharva Print Creation
S. No. 91/1, Plot No. 8, Tulshibaugwale
Colony, Sahakarnagar, Pune 411 009

For monthly subscription:
visit www.chikupiku.com
+91 91721 36478

मुलांचं आई-वडिलांना पत्र

- तुमचे विचार निश्चित असू द्या. माझ्याशी बोलताना तुम्ही ठामपणे बोला. तसं झालं की मला सुरक्षित वाटतं.
- मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो तेव्हा मला धुडकावून लावू नका. तुम्ही तसं केलंत तर माझे प्रश्न बंद होतील आणि मी उत्तरं दुसरीकडून कुठूनतरी मिळवीन.
- चारचौघांदेखत मला माझ्या चुका दाखवू नका, तुम्ही मला एकट्याला बाजूला घेऊन समजावलेत तर ते मला चांगलं समजेल.
- माझ्या सारखं मागे लागू नका. तसं केलंत तर मला ऐकूच येत नाही असं मी दाखवीन.
- मला वाईट सवयी लागू देऊ नका. वाईट सवयी लागत असल्या तर तुम्हीच लक्ष ठेवा आणि त्या लगेच मोडून काढा. मी त्यासाठी सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे.
- माझे फार लाड करू नका. मी मागीन ते मला मिळालंच पाहिजे असं मला वाटत नसतं, फक्त मी तुमची परीक्षा घेत असतो.
- माझ्या चुका म्हणजे जणू काही पापच आहे असं मला वाटू देऊ नका. त्यामुळे माझा मूल्यांवरचा विश्वास उडेल.
- मला प्रयोग करायला आवडतात हे विसरू नका. मला त्याशिवाय राहवतच नाही. तेव्हा कृपया माझे प्रयोग सहन करा.
- माझ्या बारीक-सारीक तक्रारींकडे फार लक्ष देऊ नका कारण तुम्ही माझ्याकडे लक्ष द्यावं एवढ्यासाठीच त्या असतात.
- कधी असं तर कधी तसं, असं विसंगत बोलू नका. तुमच्या बोलण्यात सुसंगती असू द्या. नाहीतर माझा गोंधळ उडतो आणि तुमच्यावरचा विश्वासही.
- मी जे करीन त्याचे परिणामही मला भोगू द्या. कधी-कधी अशाही मार्गाने शिक्षण होतं ते हवंच असतं.
- तुम्ही कधीच चुकत नाही, असं चुकूनही मला सांगू नका. मग तुमचं चुकलं की मला फार मोठा धक्का बसतो.
- तुमची तब्येत निरोगी ठणठणीत ठेवा. मला तुमची खूपच गरज आहे.

- शोभा भागवत

सिंदबादची आठवी सफर

गोष्ट - फारूक एस. काझी | चित्रं - गिरीश मालप



**''साथीदारांनो, लवकर जहाजात या.
इथं धोका आहे.''**

कप्तानाची आरोळी ऐकली आणि सगळे लगबगीने जहाजात चढू लागले. पिण्यासाठी पाणी आणि खाण्यासाठी काहीतरी घ्यावं म्हणून सगळे त्या बंदरात उतरले होते. पण त्या बंदरावर भयंकर प्राण्यांची वस्ती होती. ते प्राणी माणसांना गिळून टाकत. सगळे लगबगीने वर चढले, पण समुद्र खवळला होता. वातावरण बदललं होतं. वादळ जवळ आलं होतं. सगळेच जण घाबरून गेले होते. जोराचा वारा सुटला. शीड मोडून पडलं आणि एक मोठी लाट आली. जहाजाचे दोन तुकडे झाले

सगळेजण पाण्यात पडले. आरडाओरडा सुरु झाला. सिंदबादला एक लाकडी फळी दिसली. फळी धरून तो पुढे वाहत निघाला.





भूक लागली होती. मिळतील तशी फळं गोळा करून त्याने खाल्ली. पोटभर पाणी प्यायलं. थकल्यामुळे डोळे पेंगू लागले होते. तो एका झाडाखाली झोपी गेला. जेव्हा जाग आली तेव्हा सिंदबाद एका पिंजऱ्यात होता. बेटावरील राजाने त्याला कैद केलं होतं. त्याच्यासारखे हजारो लोक तिथं कैदेत होते.



राजा खूप दुष्ट होता. लोकांना गुलाम बनवून त्यांच्याकडून खूप कष्ट करवून घ्यायचा. त्यांना चाबकाचे फटके द्यायचा. सिंदबादला याचे खूप वाईट वाटले. **''राजा तू जर खरंच इतका ताकदवान असशील तर माझ्याशी बुद्धिबळाचा खेळ खेळ.''** सिंदबाद धाडसाने बोलला.


राजाने विचार केला. मग होकार दिला. पण एक अटही ठेवली.
''या खेळात जो कुणी हरेल त्याला त्या दोन दरवाजातून एक दरवाजा निवडावा लागेल आणि निवडलेल्या दारातून आत जावं लागेल.''

सिंदबादला शंका आली. त्याने एकवार दोन्ही दरवाजे पाहून घेतले.



एका दरवाज्यावर समुद्राचं चित्र होतं तर दुसऱ्यावर मोठ्या ड्रॅगनचं. सिंदबाद विचारात पडला. त्याने काहीतरी शक्कल लढवायची ठरवली.





बुद्धिबळाचा डाव सुरु झाला. राजा जिंकण्याच्याच बेतात होता. सिंदबाद प्रयत्न करत होता. आणि राजाची एक चूक सिंदबादला फायद्यात पडली. सिंदबादचा वजीर मारण्याच्या तयारीत राजाने आपल्या राजाला मरू दिलं. सिंदबाद जिंकला. सर्व गुलामांनी मोठा जल्लोष केला.
आनंद साजरा केला.


''थांबा, अजून खेळ बाकी आहे. राजाला दरवाजा निवडून त्यात प्रवेश करायचा आहे.''

सिंदबाद मोठ्या आवाजात बोलला. राजा रागाने लालेलाल झाला. तरीही हसत-हसत तो दारांकडे गेला. त्याने मोठ्याने हसत हसत ड्रॅगनचं चित्र असलेला दरवाजा निवडला.
सिंदबादचा अंदाज खरा ठरला. राजाने हसत हसत दरवाजा उघडला आणि आत प्रवेश केला. आणि थोड्याच वेळात त्याची किंकाळी ऐकू आली. सगळे एकदम सुन्न झाले. राजा मेला! हे कसं काय घडलं?

सिंदबाद हसला. खरंतर राजाने समुद्राचं चित्र असणाऱ्या दारामागे ड्रॅगन ठेवला होता आणि ड्रॅगनचं चित्र असलेल्या दारामागे समुद्रकिनारा होता. कोणत्याही माणसाने समुद्राचं चित्र असलेला दरवाजा निवडला असता. पण, सिंदबादने लाटांचा आवाज ऐकला होता. त्याने गुपचूप दोन्ही दारांवरील चित्रांची अदलाबदल केली. याचा पत्ता राजालाही नव्हता.

''राजा मेला!''

कुणीतरी मोठ्याने ओरडलं आणि सर्व गुलामांनी सिंदबादचा जयजयकार करायला सुरुवात केली. सिंदबादने गुलामांची सुटका केली. एका तरुण गुलामाला राजा आणि वयस्कर गुलामाला प्रधान केलं. सगळ्यांना आनंदी राहता येईल अशी व्यवस्था लावून दिली. आणि एका छोट्याशा नावेतून तो डोंगरांच्या बेटाकडे रवाना झाला. नव्या राजाने त्याला खूप साऱ्या भेटवस्तू दिल्या. मौल्यवान रत्ने, सोने, चांदीची नाणी! सिंदबाद डोंगरांच्या बेटावरून मोठ्या व्यापारी जहाजात बसला. तो पुढे चिखलाचं बेट पार करत, रुख पक्षी असलेल्या बेटाला वळसा घालून बसरा बंदरात उतरला. पुढे तो बगदादला गेला. आणि सुखात राहू लागला.






''**ओ सिंदबाद व्यापारी, तुमची आठवी सफर पूर्ण झाली असेल तर उठा आता. नऊ वाजले. शाळेत तुमचे व्यापारी मित्र वाट बघत असतील. नवव्या सफरीवर जायला.**'' आईच्या आवाजाने समीर उठून बसला. आई हसत होती. बाबांनी काल रात्री सिंदबादच्या सात सफरी सांगितल्या होत्या. समीर म्हणाला, ''**मी आठवी सफर करेन.'' आणि त्याने आठवी सफर पूर्ण केलीसुद्धा. ती ही स्वप्नात!** आई पुन्हा हसली.

समीर लाजला आणि उठून बाथरूममध्ये पळाला.

बेडकाची होडी



पावसाच्या पाण्यात
सोडत होते होडी
बेडकाने शेजारीच
मारली पटकन उडी

बेडूक बसला
टुणकन होडीत
आणि होडी गेली
वाहत वाहत नदीत

होडी गेली वाहत
धबधब्याजवळ
बेडकाच्या पोटात
झाली ढवळाढवळ

बेडकाने होडीतून
मारली उडी
होडी बिचारी
वाहतच गेली

घरी जाऊन बेडकाने
सांगितले त्याच्या आईला
"आज मी काय
ॲडव्हेंचरस गेम पाहिला!"

बेडकाने विचार केला
आता होडीचे काय झाले असेल
आई म्हणाली, "डोन्ट वरी,
त्यात आता दुसरा बेडूक बसेल!"

- वृंदा पुंडलिक, वय - ८ वर्षे

वृंदाला चित्रं काढायला, गाणी म्हणायला
आणि डोंगरात फिरायला आवडतं.

चित्र - निखिल पवार


चिकूPiku

गोष्ट - जुई चितळे

दिवाळीच्या सुट्टीत मिकू तिच्या कोकणातल्या आजीकडे गेली होती. चिकू आणि पिकूलासुद्धा खूप आवडतं कोकणात जायला. तिथे जवळच्या एका बेटावर ते ट्रिपला गेले. त्याच बेटावर सहलीसाठी पेम्बा आणि क्यूबोदेखील आले होते.

मिकू म्हणाली, **''अरे व्वा .. तुम्ही पण इथे भेटलात! किती मज्जा.. चला आता एकत्रच फिरू या बेटावर.''**

बेटावरच्या जंगलात फिरताना पेम्बाला काहीतरी दारासारखं दिसलं. सगळेजण जाऊन बघतात तर ती एक गुहा होती. खूप जुनी गुहा होती आणि तिचं जाडजूड दार घट्ट बंद करून ठेवलं होतं. आत काय असेल? दार कसं उघडायचं?



पेम्बा म्हणाला, **''हे एक कोडं आहे असं वाटतंय.''** सगळे जण विचार करायला लागले. पिकूला दारावर काहीतरी नक्षी दिसली. तिने ती सगळ्यांना दाखवली. **मिकू म्हणाली, ''ही तर दिव्यांची नक्षी कोरली आहे.''**

क्यूबो म्हणाला, **''आलं लक्षात !! सुटलं कोडं. ५ भाऊ म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे ५ दिवे आपल्याला आणायचे आहेत. ते सुंदर प्रकाश पाडतील. दिवाळीच्या रात्री पाच दिवे या दारासमोर लावले तर गुहेचं दार उघडेल.''**
पेम्बा म्हणाला, **''उडत, पोहत, चालत म्हणजे अशा वेगवेगळ्या प्रकारे आणावे लागतील का दिवे? आणि दिवाळी तर आजच आहे. चला चला आपल्याला लवकरच गोळा करावे लागतील हे दिवे.''**
सगळेजण बोटीतून मिकूच्या आजीच्या गावातल्या समुद्र किनाऱ्यावर आले. प्रत्येकाने एखादा दिवा मिळवून थोड्या वेळात पुन्हा इथेच भेटायचं असं ठरवलं.



मिकूला ओळखीचे रिक्षावाले काका दिसले.
''काका प्लिज आजीच्या घरी घेऊन चला ना मला.''
आज्जीकडून तिने एक वातीचा कंदील घेतला आणि पुन्हा किनाऱ्यावर यायला निघाली.




पेम्बाला एक जुनी सायकल दिसली. ती चालवत तो जवळच्या दुकानात गेला. तिथून त्याने कागद, डिंक आणि मेणबत्ती घेतली. कागदाचा सुंदर फुग्यासारख्या आकाराचा आकाशकंदील त्याने तयार केला. त्याच्या तळाशी छोटी मेणबत्ती बसवून टाकली. ती पेटवली की कंदील हवेत वर उचलला जाईल. पेम्बाच्या गावात दिवाळीच्या रात्री आकाशात असे कंदील सोडण्याची पद्धत होती.



क्यूबोला कोणीतरी टाकून दिलेली दिव्याची माळ सापडली. पण ती बिघडलेली वाटत होती. त्याने एक बॅटरी आणली. त्या माळांच्या वायरची दुरुस्ती करून त्याला बॅटरी जोडून त्याने ती माळ चालू केली.


Audio story available on www.chikupiku/audio



चिकू, पिकू पण दिवा शोधायला निघाले. वाटेत त्यांना खंडू बैल भेटला. त्याच्या गाडीत बसून ते दोघे गावातल्या मुख्य चौकात आले. तिथल्या सजावटीमध्ये खूप पणत्या होत्या त्यातली पणती घेऊन परत किनाऱ्यावर निघाले.


आपापले दिवे घेऊन बोटीतून येताना त्यांच्या लक्षात आलं की अजून चारच दिवे मिळालेत. पाचव्या दिव्याचं आता काय करायचं?

चित्र - भक्ती दलाल



चिकू, पिकूला पाण्यात फिशिरा दिसली. तिला त्यांनी सगळी गोष्ट सांगितली. फिशिरा म्हणाली,

फिशिरा, ऑक्टो, आणि किरो बुडालेल्या बोटीत एखादा दिवा शोधू लागले. बोट खूप जुनी होती आणि पाण्यात राहून तिच्यामधल्या काही वस्तू गंजून गेल्या होत्या. पण त्या सगळ्यात एक सोनेरी चमकणारी वस्तू फिशिराला दिसली. सगळ्यांनी जोर लावून बाहेर ओढून काढल्यावर दिसलं की ती एक समई होती. म्हणजे आता पाचवा दिवा पण सापडला!! फिशिराने लगेच ती वर आणून चिकू, पिकूला दिली.



हळूहळू अंधार पडायला लागलाच होता. सगळ्यांनी मिळून पाच दिवे गुहेच्या दाराजवळ लावले. पणती, समई, कंदील, माळ यांचा सुरेख उजेड पडला.

उडणाऱ्या आकाशकंदिलातील मेणबत्ती लावल्यावर हळूहळू तो वर उडायला लागला आणि त्याच वेळी गुहेचं दार सुद्धा हळूहळू उघडायला लागलं. सगळ्यांनी उत्सुकतेने आत पाहिलं तर आत काय होतं माहीत आहे?


तू सांग बरं काय असेल?


पुढची गोष्ट पूर्ण करून आम्हाला पाठव.

चिमणी चित्र

-आभा भागवत

या चित्रात नदीचं पाणी आणि त्यात तरंगणाऱ्या पणत्या आहेत. मी ६ पणत्या काढल्या आहेत. बाकीच्या तू काढ. किती पणत्या मावतात मोजून लिही. शेजारच्या पूर्ण केलेल्या चित्रात मला १२५ माववता आल्या. शिवाय नदीच्या पाण्यात थेंबाथेंबांचा पोत (texture) सुध्दा काढ.





तुला चित्रात किती पणत्या काढता आल्या?

तुझ्या चित्राचा फोटो आम्हाला पाठव 9172136478

पालकांसाठी

मुलांना मोजून काढायला किंवा काढलेलं मोजायला आवडतं. एकच चित्र अनेकवेळा काढताना त्यांची एकाग्रता वाढते. आणि देखणं चित्र तयार होतं. इथे मुलांनी कॉपी करणं अपेक्षित नाहिये. त्यांना जे नवीन सुचेल ते काढून पाहू दे.

Nature and मी

गोष्ट - गिरीश जठार

निनू हत्ती एकदा हरवला. झालं असं की तो त्याच्या कळपाबरोबर उंच डोंगर चढत होता. आईने त्याला सांगितलं होतं,

''माझी शेपूट सोडून कुठे जाऊ नकोस.''

पण नेमकं एक पिवळं फुलपाखरू त्याच्या डोक्यावर येऊन बसलं. मग काय तो त्याच्या मागे-मागे दुसऱ्या दिशेला गेला आणि वाट चुकला. त्याला रडू येत नव्हतं पण थोडी भीती वाटत होती. त्याने इकडे-तिकडे पाहिलं. त्याला एक छोटी मुलगी दिसली. निनूला बघून ती म्हणाली

''अरे छोटू हत्ती, तू एकटा इथे काय करतोयस? तुझी आई कुठंय?''

निनू हत्ती तोंड पाडून म्हणाला, **''मी रस्ता चुकलोय. आम्ही सगळे हत्ती 'पेरी-ला' डोंगराच्या उंच कड्यावर निघालो होतो. ते बघ त्या तिथे!''** वर मान करत मुलगी म्हणाली, **''इतक्या वर??? पण तिथे तर बर्फ असतो.''**

निनू म्हणाला, ''हो तिथे बर्फ असतो पण तिथल्या जमिनीत मीठ आहे. ते खायला आम्ही तिथे जातो. आम्ही गवत खातो. त्यात मीठ नसतं. आई म्हणते पेरी-ला डोंगराच्या जमिनीतलं मीठ खाऊन वर्षभर आम्ही तंदुरुस्त राहतो. वर्षातून एकदा आम्हाला तिथे जावंच लागतं. पण ही माझी पहिलीच वेळ आहे तिथे जायची. आणि मी वाट चुकलोय. आता कसं काय पोहोचणार मी तिथे?''

मुलगी म्हणाली, **''चल मी येते तुझ्या बरोबर. आपण दोघे मिळून जाऊ या उंच डोंगरावर. माझे आजोबा जायचे तिथे ध्यान करायला.''**



''तू येशील?'' निनूला बरं वाटलं. दोघे निघाले. वर जायला लागल्यावर थंडी वाढायला लागली. मुलीने तिचा स्कार्फ अंगाभोवती गुंडाळला. डोंगराच्या पाऊलवाटेवरून ते पुढे-पुढे जात होते. वाटेत थांबून त्यांनी जेवण केलं. निनू गवत खायला लागला. छोट्या मुलीने तिच्या डब्यातला परतलेला मश्रुम खाल्ला. थोडा मश्रुम तिने निनूला दिला. त्याने मिटक्या मारत तो संपवला. थोडावेळ आराम करून ते पुन्हा निघाले.



पुढची वाट चढायला जरा अवघड होती. चढावरून जाताना मुलीचा पाय निसटला ती घसरायला लागली पण निनूने झटदिशी तिला धरलं. **''हुश्श..वाचले! बरं झालं तू मला धरलंस!''** मुलगी म्हणाली.



निनूला डोंगराळ भागात चालायची सवय होती. त्याने झाडाची एक काठी तोडून मुलीला दिली. **''हे घे. ही काठी टेकवत-टेकवत चाल म्हणजे तू पडणार नाहीस.''**

वाटेत एक छोटं तळं होतं. तिथल्या एका झाडावर भरपूर फुलपाखरं भिरभिरत होती. निनू सोंड डोलवत फुलपाखरांच्या मागे पळायला लागला. **"चल आता. नाहीतर पुन्हा वाट चुकशील."** निनूची सोंड ओढत मुलगी म्हणाली



बरंच पुढे गेल्यावर झाडांवर हळूहळू बर्फ दिसायला लागला. निनूने सोंड हवेत हलवली. सूं... सूं... करून वास घेतला. जोरात ओरडत तो म्हणाला **"चल पटकन, आई आणि सगळेजण त्या बाजूला आहेत"** दोघे धावत सुटले.

एका भल्या मोठ्या दगडाच्या पलीकडे पांढराशुभ्र बर्फ पसरला होता. निनूचा कळप तिथेच होता. काही हत्ती जमीन उकरून क्षार म्हणजे मीठ खात होते. तर काही डोंगर उकरून मीठ शोधत होते.

"हुर्रे!!!पोहोचलो आपण." दोघांनी एकमेकांना टाळी दिली.


निनू धावत गेला आणि आईला बिलगला. आईने त्याला लाडाने चाटलं. निनू म्हणाला, **"आई, ही माझी मैत्रीण आहे. आम्ही दोघे मिळून एवढा डोंगर चढून आलो, एकटे"**
आई हसून म्हणाली, "काय नाव तुझ्या नव्या मैत्रिणीचं?" निनू म्हणाला, **"अरे, नाव तर मी विचारलंच नाही."**
मुलीने हत्ती आईला वाकून नमस्कार केला आणि म्हणाली, **"माझं नाव दोर्जी."** आईने हसून दोर्जीच्या डोक्यावर सोंड ठेवली. जमीन उकरून निनूने चटक-मटक मीठ चाटून खाल्लं.
निनू आणि दोर्जीने बर्फात भरपूर मस्ती-मजा केली.

चित्रं - योगिता धोटे



निसर्गविषयक बुद्धिमत्ता

Nature and मी सदरातल्या गोष्टींमधून प्राणी, पक्षी, किडे, कीटक, झाडं यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न आम्ही करतो. अरुणाचल प्रदेशमध्ये हत्ती असे उंच बर्फाळ डोंगर चढून जमिनीतले क्षार खाण्यासाठी जातात. गोष्टीरूपाने अशी माहिती मुलांपर्यंत छान पोहोचते.



खेळखेळू या!



तुला हे पदार्थ ओळखता येतील का?
धणे, जिरे, लवंग, तमालपत्र, मिरी, वेलदोडा असे मसाल्याचे पदार्थ मांडून मुलांना त्यांची नावं सांगा. आता त्यांना पदार्थ ओळखायला सांगा.



हात न लावता चुरमुरे खाऊन दाखव!
एका ताटलीत चुरमुरे ठेवा. हात न लावता चुरमुरे खायला सांगा.



पुस्तक डोक्यावर ठेवून चालून बघू. हात लावायचा नाही हं!



डाव्या हाताचं चित्र
डाव्या हाताने तुझं नाव लिहून बघ, एखादं चित्र काढून बघ.



आठवून सांग बरं!
मुलांच्या माहितीच्या २०–२५ वस्तू एकत्र ठेवायच्या. एक–दोन मिनिटं मुलांना वस्तू बघू दे. मग टॉवेलने या वस्तू झाकून ठेवायच्या. मुलांना विचारा, 'सांग बरं कुठल्या वस्तू रुमालाखाली आहेत?'




ग्लासची गंमत
दोन काचेचे ग्लास घे. एकात पाणी भर, एक रिकामा ठेव. एका कागदाच्या तुकड्यावर लाल रंगाचा मोठा बाण काढ. रिकाम्या ग्लासमागे हा कागद धरुन बघ. तो आहे तसाच दिसतो. भरलेल्या ग्लासमधून बघताना त्याची दिशा बदलते.

साभार - गंमत जत्रा,
लेखक - शोभा भागवत
उन्मेष प्रकाशन

हे चित्र छान रंगव. चित्रातल्या वाहनांना किती चाकं असतात सांग ? कुठल्या वाहनांना चाकंच नाहीयेत?



तू रंगवलेल्या चित्राचा फोटो आम्हाला पाठव 9172136478



Transformar TRON

Story - Arnav Deshpande


Tron was a car who loved to go on long drives. He loved exploring different parts of his country. His friends always told him to take well-known roads but he never listened, until one day.



That day, he had taken a new route to a forest. He had lots of fun seeing tall trees and beautiful birds. But he soon realised he was lost! Poor Tron wandered around, looking for the exit but could not find one.

He then came across a river. The only way was across the river. He was very worried and kept praying! Suddenly, a voice popped up from his system!





"Boat mode: activated,"


said the robotic voice. Tron then felt his body changing! His wheels disappeared and instead four propellers appeared pointing downwards. His car's body became like a boat in less than a minute! **"WHEEEEE!"** Tron shouted as he went speeding across the river.

Once he got across, his body became a car again. But then there was a huge area of thorny bushes. His tire got punctured! Tron panicked. Just then, he heard the same robotic voice again.



"Aeroplane mode: activated."

This time his doors extended to form wings and his wheels became jet engines. He even got tail wings on his back. With a swift **WHOOSH!** he took off into the sky, up and away from the forest!



"YIPEEEEE!" he shouted and flew down to his home. He had such an amazing story to tell everyone about being a transformer!

Illustrator - Oindrila Kundu

लिलूचं चित्र

लिलूने काढले डोंगर चार
सगळे गर्द हिरवेगार
लाल गोळा डोकावणारा
त्यावर छान किरणांचा तुरा

नागमोडी झुळ झुळ नदी
शेत भोवती हिरवेगार
शेतामध्ये घर चिमुकले
एकच खिडकी एकच दार

घरामागे झाड लपले
दोन ढग पळत चालले
पक्षी निघाले किलबिल करत
ढगांबरोबर लावली शर्यत

"चित्र माझे कसे झाले?"
लिलूने आजीला ओढून आणले
आजी म्हटली, "मस्ताड झाले!"
नसते बाबा मलापण जमले"

- विद्याधर शुक्ल

कविता वाचून
लिलूचं चित्र तू
पूर्ण कर. आम्हाला
फोटो पाठव.



तीन चांदण्या


गोष्ट - अमृता गोटखिंडीकर

तीन चांदण्या संध्याकाळ झाली की आकाशामध्ये उगवत. एकमेकींच्या जवळ उगवत असल्याने त्यांची चांगलीच घट्ट मैत्री झाली होती. त्या रोज आकाशात उगवल्या की ढगांबरोबर लपाछपी खेळत, कधी नुसतीच गाणी म्हणत तर कधी हात धरून फेर धरत. सूर्य उगवायच्या आधी घरी निघून जात.



या चांदण्यांना संध्याकाळी बरेच पक्षी समोरच्या डोंगराच्या पार जाताना दिसत. कुठे जात असतील बरं ते? डोंगराच्या टोकावर एकच शेंडी आहे. डोंगराला कुठे शेंडी असते? शिवाय त्या डोंगराच्या मागून कसले कसले छान-छान आवाज येत असतात. ते कशाचे आहेत बरं?

मग तीन चांदण्यांनी ठरवलं की डोंगराच्या मागे काय आहे ते आपण पाहायला जाऊ. दुसऱ्या दिवशी आकाशात चांदण्या भेटल्या त्या छोटी सॅक, डब्बा, वॉटरबॅग घेऊनच! आणि ठरवल्याप्रमाणे निघाल्यासुद्धा त्या डोंगराच्या दिशेने.
ढगांनी विचारलं,



''अगो बायांनो कुठे चाललात?''

तिघी चांदण्या नुसत्याच त्यांच्याकडे बघून हसल्या.

जरा पुढे गेल्यावर त्यांना भेटला चांदोबा. चांदोबाने विचारले,

''अरे पिटुकल्यांनो, कुठे निघालात इतक्या दूर?''

आता मात्र चांदण्यांनी खरं सांगितलं.

''आम्ही पाहायला चाललो दूर दूर... डोंगराच्या मागून कुठून येतात सूर?'' चांदोबा हसला आणि म्हणाला,

''सांगितलं असतं मी डोंगराच्या मागे आहे काय काय, पण निघालाच आहात तिकडे तर सांगण्यात पॉईंट काय ?''

स्वतःच्याच बोलण्यावर हसत हसत चांदोबा त्यांना ओलांडून निघून गेला.

तिघी चांदण्या हसत खिदळत पुढे निघाल्या. आता ओळखीचा रस्ता केव्हाच मागे पडला होता. आता त्यांना रस्त्यात अनोळखी तारे दिसत होते. लाल, मोठाले, चिडके तारे हात-वारे करून त्यांना बोलावत होते. तर छोटे, बुटके, पांढरे तारे त्यांना ''घरी जा'' असे ओरडून सांगत होते. त्या सगळ्यांतून वाट काढत डोंगराच्या ओढीने चांदण्या पुढे निघाल्या.





तेवढ्यात त्यांना भेटली एक पिसाऱ्याची चांदणी. चांदण्यांनी लगेच ओळखले, हा तर उपटसुंभ धूमकेतू. त्याचा पिसारा इतका सुंदर होता पिवळा, निळा की त्या त्याच्याकडे पाहतच बसल्या. धूमकेतू त्यांना म्हणाला,

**अरे इटुकल्यांनो,
चलता का फिरायला?**

चांदण्या लांबूनच म्हणाल्या, **''नको रे बाबा, एकदा का गेलास तर परत पत्ता नसतो तुझा.''** धूमकेतू लांबूनच त्यांच्याकडे पाहत दूर निघून गेला. चांदण्या चालत चालत पुढे निघाल्या. त्यांचे पाय दुखायला लागले.



शेवटी त्या डोंगराच्या शेंडीजवळ पोहचल्या. ती शेंडी नाही तर एक उंच झाड आहे हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्या खळखळून हसल्या. पण डोंगराच्या मागे काय आहे ते मात्र त्यांना काहीच दिसत नव्हतं. चांदण्या हिरमुसल्या.



''हॅट! आपण इतके लांब चालत आलो आणि इथे तर काहीच नाही.'' त्यातली एक चांदणी म्हणाली, **''आता इतकं आलोय लांब तर जरा थांबू, विसावा घेऊ. डब्बा खाऊ आणि मग जाऊ परत.''** ते ऐकून त्या तिन्ही चांदण्या झाडाजवळ असलेल्या एका ढगात विसावल्या. तेवढ्यात कुठून तरी गार गार वाऱ्याची झुळूक आली. चांदण्या शहारल्या. हलकेच ढगांची शाल त्यांनी ओढून घेतली. त्या वाऱ्याच्या झुळकेबरोबर एक छान फुलांचा मंद मंद वास आला. हा वास कुठून येतो म्हणून चांदण्या पाहायला लागल्या तर ते शेंडीचं झाड केशरी देठ असलेल्या पांढऱ्या फुलांनी बहरून गेलं होतं. सुंदर फुलांचा सडा झाडाखालीसुद्धा पडला होता.



चांदण्यांना त्या पांढऱ्या शुभ्र फुलांच्या सड्याकडे पाहून वाटले, आपण आकाशातल्या चांदण्या आणि या सुगंधाच्या चांदण्या! तेवढ्यात आवाज आला एका चिमणीचा. चिमणी तिच्या पिल्लांना उठवत होती ,

''उठा उठा, पहाट होईल.''

''काय होईल?'' चांदण्यांनी एकमेकींकडे पाहत विचारले. चांदण्यांना पहाट म्हणजे काय माहीतच नव्हतं.

रोज संध्याकाळी उगवायचं आणि चंद्र आकाशात असताना, अंधार असतानाच मावळायचं. त्यामुळे पहाट त्यांनी कधी बघितलीच नव्हती. चांदण्यांनी ठरवलं, आपण पाहूनच जाऊ पहाट म्हणजे काय?

हळूहळू वातावरण बदलायला लागलं. हलके हलके सगळीकडे जाग आली. पक्ष्यांची कुजबूज वाढली. आकाश केशरी-गुलाबी रंगांनी भरून गेले. वारा वाहायला लागला. सोनेरी प्रकाश सगळीकडे पसरला.

त्या प्रकाशात चांदण्यांना दिसले, डोंगराच्या मागून एक धबधबा वाहत आहे. त्याचा तो धो-धो आवाज आहे. धबधब्याचे पाणी डोंगराच्या खाली येऊन एका मोठ्या तलावात येत आहे. लाल, गुलाबी, पिवळ्या रंगाच्या कमळांनी तो तलाव अगदी भरून गेला आहे. कितीतरी भुंगे, फुलपाखरे फुलांभोवती रुंजी घालत आहेत. तळ्याच्या भोवती हिरवेगार गवत आहे. गवतात रानफुले उमलली आहेत. चांदण्यांनी ते सगळं दृश्य डोळ्यात भरून घेतलं आणि हळूहळू त्या परत घराकडे निघाल्या.




चित्र - ओंकार मरकळे

रंगीत कागद, टिकल्या, मणी चिकटवून किंवा छान रंगांनी रंगवून हा आकाशकंदील सजव.

दृश्य-अवकाशीय बुद्धिमत्ता

ह्या बुद्धिमत्तेमुळे मोकळ्या जागेचा कल्पक वापर करता येतो. कलरिंग, कोलाज अशा ॲक्टिव्हिटीज आहेतच, शिवाय पेपरातली चित्रं, पाठकोरे कागद, घरातला मोकळा कोपरा मुलांना प्रयोग करायला, चित्र काढायला देऊ या.





झाडी-गोडी


गोष्ट - केतकी घाटे । चित्रं - हबीब अली

एकदा एका मैनेने वडाची भरपूर फळं खाल्ली. फळातल्या बियासुद्धा तिने खाल्या. मग उडत ती एका अंगणात आली. एका मोठ्या दगडाशेजारी तिने शी केली. दुसऱ्या दिवशी पाऊस पडला. आणि त्या शीमधून एक रोप डोकावू लागलं. आधी त्याला फक्त दोनच पानं होती आणि जमिनीखाली मूळ होतं. मुळाने मातीतून पाणी आणि अन्न पानांकडे पाठवायला सुरुवात केली. हळू-हळू दगडाला चिकटून रोपटं वाढू लागलं.

पाच वर्षांत झाड दगडाइतकं उंच झालं. त्याला भरपूर पानं आली. मुळं जमिनीखाली पसरली. झाडाला हळू-हळू पारंब्या फुटायला सुरुवात झाली. पारंब्या म्हणजे फांद्यांवरून खाली वाढणारी मुळं!! बघता-बघता पुढच्या पंधरा वर्षात झाड दगडापेक्षा खूऽऽऽप उंच झालं. काही पारंब्या आता जमिनीपर्यंत पोचल्या. त्यांनी पण जमिनीतून अन्न-पाणी शोषायला सुरुवात केली. झाडाची वाढ सुपर स्पीडने होऊ लागली.

हा हा म्हणता म्हणता पन्नास वर्षं लोटली. झाडाचा भला मोठा डोलारा तयार झाला. भरपूर सावली देणारा. त्याच्या अंगा-खांद्यावर पक्षी येऊन बसू लागले. झाडाची फळं खायला लागले. त्यावर घरटी बांधायला लागले.






एकदा अचानक एका संध्याकाळी मैनांचा थवा किलबिलाट करत आला आणि झाडाच्या फांद्यांवर विखुरला. थोड्या वेळात अजून एक थवा आला. मग अजून एक. असं करत शेकडो थवे आणि हजारो मैना आल्या. एकमेकींशी भांडून शांत झोपी गेल्या. पहाटे किलबिल करत पुन्हा एक-एक थव्याने उडून गेल्या. आता रोज रात्री ह्या मैना आराम करायला झाडावर यायला लागल्या!

अजून पन्नास वर्ष गेली आणि वडाच्या झाडाचा शंभरावा वाढदिवस आला. त्याची सावली मोठी झाली आणि पारंब्याही लांब पसरल्या. आता या भल्या मोठ्या झाडावर कित्तीतरी पक्षी, त्यांची पिल्लं, खारी, मुंग्या-किडे राहतात. छोटी मुलं सूरपारंब्या खेळतात. माणसं दगडावर बसून गप्पा मारतात.

वटवृक्षाला भारताचा राष्ट्रीय वृक्ष होण्याचा बहुमान मिळाला आहे. तो संपूर्ण भारतात मुख्यतः मानवी वस्तीच्या बाजूला लावलेला आढळतो. हा वृक्ष अत्यंत 'कणखर' आहे. निकृष्ट मातीत, मुरमांत अगदी खडकावरही वाढू शकतो. हा 'रुंद पानी' असल्याने भर उन्हातही त्याची दाट सावली तयार होते. हे विशाल वृक्ष परिसरात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याची मुळं, साल, पाने, चीक अशी सर्वच अंगे विविध औषधात वापरली जातात.




पण तुला माहितीये! शंभर वर्षांचं हे झाड तसं तरुणच आहे. त्याचे आजोबा आणि त्यांचे मित्र आहेत २५० ते ३०० वर्षांचे. ते कलकत्त्याच्या वनस्पती उद्यानात राहतात.

तू तुझ्या घराजवळचा वड शोधून काढ. तो किती वर्षांचा असेल याचा अंदाज लावू शकशील का? पारंब्याचे गठ्ठेसुद्धा मोजता येतील. झाडावर कुठले पक्षी, कीटक येतात हे पण बघ. चला तर मग! वडाच्या शोधात!

पानातली नक्षी

- आभा भागवत

या पानाच्या शिरांमुळे झालेल्या पट्ट्यांमध्ये वेगवेगळी नक्षी आहे.
ती एका आड एक काढून पानाचं चित्र पूर्ण कर.



पालकांसाठी

एका आड एक नक्षी काढण्याचं आव्हान मुलांना अवघड वाटू शकतं. त्यामुळे मुलं जे काही काढतील ते समजून घ्या आणि त्याचं कौतुक करा.

तुझ्या चित्राचा फोटो आम्हाला पाठव 9172136478




सायकलची सायकल

गोष्ट - अमृता कावणकर

एक होती सायकल. पार्किंगच्या एका कोपऱ्यात ती पडून होती. तिच्यावर धूळच धूळ साठली होती. बरेच दिवस घरातल्या कोणीच सायकल चालवली नव्हती. पार्किंगमधली मोटरसायकल, स्कूटर आणि कार तर रोज फेरफटका मारून यायचे.
बुंग बुंग.... भ्रूम भ्रूम....

पण सायकल तशीच एका जागी होती. या सायकलला फिरायला आवडायचं. तिला टेकडीवर जायचं होतं. चढावरून जोऽऽऽर लावत वर वर. ... आणि उतारावरून झुपकन खाली...तिला झापझुप नागमोडी चालायचं होतं. खडबडीत रस्त्यावरून धड-धड-धड-धड धावायचं होतं.






एक होता मायकल. मायकलच्या शाळेतली बरीच मुलं सायकलने ये-जा करायची. मायकललापण एक सायकल हवी होती. खाऊसाठी मिळणारे पैसे तो साठवत होता. त्यातून त्याला सायकल घ्यायची होती. तो विचार करायचा,

''सायकल मिळाली की शाळेत मी तिला नेणार,
तिच्यावर बसून आईला सामान आणून देणार,
फिरायला जाणार.''





एकदा शाळेतून घरी जाताना त्याला दोन माणसं बोलताना दिसली.
''पाचशे रुपये देत असशील तर घे सायकल. नाही तर राहू दे.''

एक काका भंगारवाल्याशी बोलत होते. मायकल तिथेच थांबला. काकांच्या शेजारी सायकल होती. मायकलने हळूच बघितलं. सायकल लाल रंगाची होती. सायकल बघून मायकलचे डोळे चमकले. सीट थोडं फाटलं होतं.
''पण ते काय शिवता येईल'' मायकल म्हणाला.
तिचं स्टायलिश वाकडं हॅन्डल त्याला भारी आवडलं.

''इतकी सुंदर सायकल भंगारात का बरं देत असतील? मी विकत घेऊ का? पण माझ्याकडे तर ३३० रुपयेच साठलेत. विचारून तर बघू या!''

धीटपणे तो पुढे गेला आणि म्हणाला, **''काका, सायकल मला विकत द्याल का? पण माझ्याकडे ३३० रुपयेच साठलेत!''**



काकांनी त्याच्याकडे पाहिलं आणि विचारलं, **''सायकल घेऊन तू रे काय करणार?''** मायकल म्हणाला, **''सगळ्यात आधी तिला स्वच्छ अंघोळ घालणार, ते फाटलेलं सीट शिवणार. आणि मग तिला थेट टेकडीवर घेऊन जाणार. सुम्मऽऽऽ''**

सायकल खुद्कन हसली. ३३० रुपये काकांना देऊन मायकल आणि सायकल घरी निघाले.



चित्र - अंबिका करंदीकर

माझी सायकल

कविता - एकनाथ आव्हाड

सायकल माझी आवडे मला
घेऊन जाई दूर शाळेला

धूर कधी ती नाही सोडत
वाटेत बिघडून नाही रडत

पेट्रोल, डिझेल नाही लागत
शहाण्यासारखी असते वागत

व्यायामाला माझ्या देते जोड
तिच्यात नाही कसलीच खोड

पळते कशी ती हरणावाणी
वेळेत जाई घरी घेऊनी

मोटार, गाडी मला ना पास
सायकल माझी आहेच खास...!




आंतर्व्यक्ती बुद्धिमत्ता

इतरांशी संवाद साधण्यासाठी ही बुद्धिमत्ता आवश्यक असते. मुलांना गोष्ट सांगायला प्रोत्साहन देऊन,गप्पा मारून त्यांचं संवाद कौशल्य विकसित करता येईल. गोष्ट सांगताना अधेमधे मुलांशी गप्पा मारता येतील. तू काय करशील? तुला कुठलं चित्र आवडलं?

गाडी आली गाडी आली चला पळा रे.
गाडी थांबली, गाडी थांबली, धक्का मारा रे!


गाडी आली काश्मीरहून
सफरचंद आणली भरून भरून
सफरचंदाची पेटी उतरून घ्या रे
आणि धक्का मारा रे!





गाडी आली नागपूरहून
संत्री आणली भरून भरून
संत्र्यांची पेटी उतरून घ्या
आणि धक्का मारा रे!

गाडी आली गाडी आली चला पळा रे.
गाडी थांबली, गाडी थांबली, धक्का मारा रे!



संगीतविषयक बुद्धिमत्ता

ठेक्यात म्हणता येणारी गाणी, बडबडगीतं मुलांबरोबर आपणही म्हणू या. संगीतामुळे घरातलं वातावरण आनंदी राहायला मदत होईल.

गाडी आली झुकझुक

गाडी आली वसईहून
केळी आणली भरून भरून
केळ्यांची पेटी उतरून घ्या रे
आणि धक्का मारा रे!

गाडी आली गोव्याहून
काजू आणले भरून भरून
काजूची पेटी उतरून घ्या रे
आणि धक्का मारा रे!

कविता - साभार, गरवारे बालभवन
चित्र - श्रीनिवास बाळकृष्ण

गाडी आली कोकणातून
आंबे आणले भरून भरून
आंब्याची पेटी उतरून घ्या रे
आणि धक्का मारा रे!

गाडी आली गाडी आली चला पळा रे.
गाडी थांबली, गाडी थांबली, धक्का मारा रे!



चित्रातली फळं छान रंगव. तू अजून कुठल्या गावावरून गाडी बोलावशील. त्याची कविता करून आम्हाला पाठव.

टँकरची गोष्ट

गोष्ट - राजीव तांबे
चित्र - ओंकार महामुनी



पाण्याने भरलेला टँकर घेऊन अन्वय निघाला.
टँकर जंगलातून जात होता.
इतक्यात समोरुन वासरू आलं.
टँकर थांबला.

वासरू म्हणालं, ''**मला तहान लागलीय. पाणी दे ना रे अन्वय.**''

अन्वय म्हणाला, ''**थांब. मी मागचा नळ उघडतो. मग भरपूर पाणी पी.**''

वासरू म्हणालं, ''**अरे ओंजळीने पाणी प्यायला मला काही बोटं नाहीत. मला आहेत खूर. मला टबात पाणी दे पाहू.**''

अन्वय म्हणाला, ''**अरेच्या खरंच की!**''

अन्वयने टबात पाणी दिलं.

वासरू मटामटा चटाचटा पाणी प्यायलं.

वासरू म्हणालं, ''**थँक्यू अन्वय**''

टँकर गेला पुढे.





रस्त्यातल्या एका झाडाने जोरजोरात फांद्या हलवून टँकरला थांबवलं. टँकर थांबला. झाड म्हणालं, ''**आम्हाला तहान लागलीय. पाणी दे ना रे अन्वय.**''

अन्वय म्हणाला, ''**थांबा. मी वरचं झाकण उघडतो मग भरपूर पाणी प्या.**''

झाड म्हणालं, ''**अरे आम्ही पायाने पाणी पितो.**

तो पाइप घे आणि आमच्या पायावर पाणी घाल.''

अन्वय म्हणाला, ''**अरेच्या खरंच की!**''



अन्वयने पाइपाने झाडाच्या पायावर पाणी घातलं. झाडाने सपसप सपासप पाणी शोषलं. आणि मग झाडावर हजारो फुलं फुलली. फुलं म्हणाली,
''**थँक्यू अन्वय**''.
टँकर गेला पुढे.



रस्त्यात समोरच तीन बेडूक उभे होते.

टँकर थांबला.

अन्वयने विचारलं, ''**तुम्हाला तहान लागली आहे का?**''

बेडूक म्हणाले, ''**आम्हाला नाही.. माशांना खूप तहान लागलीय. त्यांना पाणी दे ना रे अन्वय.**''

अन्वय म्हणाला, ''**बोलव सगळ्या माशांना इथे. आपल्याकडे खूप पाणी आहे.**''



बेडूक म्हणाले, ''**अरे माशांना पाण्याबाहेर जाता येत नाही. तूच तिथे चल.**''

अन्वय म्हणाला, ''**अरेच्या खरंच की!**''

बेडकांनी रस्ता दाखवला आणि अन्वय गेला तळ्याकाठी.

तळ्यातलं पाणी आटलं होतं. अन्वयने पाइप घेतला. तळ्यात पाणी सोडलं. मासे सुळसुळू लागले. शेपट्या हलवत नाचू लागले.
मासे म्हणाले, ''**थँक्यू अन्वय.**''

टँकर गेला पुढे.



गावात येणारा टँकर लोकांनी लांबूनच पाहिला. गावातले पुरुष, बायका, लहान मुलं, लहान मुली, दादा, ताई, आजोबा, आजीबाई हातात लहान मोठ्या बादल्या, कळशा, हंडे आणि मोठे डबे घेऊन टँकरच्या दिशेने पळतच सुटले. टँकर गावात आला. सगळ्या माणसांनी टँकरला वेढा घातला.


''**पाणी द्या.. पाणी द्या**'' असं सगळी माणसं जोरजोरात ओरडू लागली. दंगामस्ती करू लागली. ढकलाढकली करू लागली. टँकरवर उभं राहून अन्वय म्हणाला, ''**कुणालाही पाणी मिळणार नाही. सगळ्यांनी आधी रांगेत उभे राहा.**'' सगळी माणसे रांगेत उभी राहून मग पाणी घेऊ लागली. अन्वय म्हणाला, ''**रांगेत राहून पाणी घेतलं तर सर्वांना पाणी मिळतं आणि पाणी फुकट जात नाही.**'' मोठी माणसं म्हणाली, ''**अरेच्या खरंच की!**'' लहान मुले म्हणाली, ''**थँक्यू अन्वयदादा.**'' टँकर गेला पुढे.

पुढच्या गावातल्या लोकांनी येणारा टँकर लांबूनच पाहिला. सगळे जण हातात लहान मोठ्या बादल्या, कळशा, हांडे, टब आणि मोठे डबे घेऊन पटापट रांगेत उभं राहून टँकरची वाट पाहू लागले. गावात टँकर येताच सगळे जण एकमेकांना मदत करत पाणी भरू लागले. टँकरवर उभं राहून अन्वय म्हणाला, ''**थँक्यू मित्रांनो.**''

टँकर पुढे पुढे जातच राहिला...



कोडे गरम



मी वाजते ...
पण कोणालाच ऐकू येत नाही.
ओळख मी कोण?

– थंडी



मी असते लांब, लांब, लांब
स्टेशन म्हणते थांब, थांब, थांब
इंजिनाचा धूर भग्, भग्, भग्
उत्तर सांग मग, मग, मग



मला कान आहे पण
मला ऐकू येत नाही..
ओळख मी कोण?

– कप



मी उडतो आकाशात
तरीही नाही पक्षी
आकाशात काढतो
धुराची नक्षी

– विमान



असं काय आहे जे पडतं
पण उचलता येत नाही?...
ओळख मी कोण?

– ऊन






दुधारी, दह्यारी, विरजणारी
ताकारी, लोणारी हा माझा प्रवास
खमंग, खमंग माझा वास
वरण भाताचा मी मित्र
माझ्या प्रवासाचं काढ चित्र


– दूध


चिमा काय कामाची

या वाक्यात एक गंमत लपली आहे. सापडली तुला? वाक्य उलटं वाचून बघ. म्हणजे शेवटच्या अक्षरापासून सुरु करून पहिल्या अक्षरापर्यंत वाच.

अशी अजून वाक्यं तुला सुचली तर आम्हाला नक्की लिहून पाठव.








यकली आणि करंजीच्या गप्पा पूर्ण कर. या गप्पा ऐकून अनारसा काय बरं विचार करत असेल?

या कोड्यात चिकू पिकूच्या अंकातल्या गोष्टींमधली तुमच्या मित्रांची नावं लपलेली आहेत. तुला शोधता येतील का?


ट	बा	पि	छ	फि
म्पू	चि	कू	ऑ	शी
ग	ल	बु	क्टी	रा
बा	गु	ल	बु	वा
फि	रा	छ	बी	शि

'रविवार' या शब्दातल्या अक्षरांपासून रवा, वार असे शब्द करता येतात. आता तू सांग 'वातावरण' या शब्दापासून कोणकोणते शब्द तयार होतील?

सोपी रांगोळी



या सोप्या रांगोळीसाठी १० ठिपके आडवे आणि १० ठिपके उभे असे १०० ठिपके एकसारख्या अंतरावर काढले आहेत. रेघा, चौकोन, त्रिकोण, गोल असे आकार वापरून तुला अशी रांगोळी काढता येईल का?



पालकांसाठी

कागदावर रांगोळी काढून झाली की मुलांना प्रत्यक्ष रांगोळी काढून बघू दे. रोज नवी रांगोळी काढायचं challenge मुलांना घ्यायला आवडेल का विचारा. यातून मुलांची प्रतिभा दिसेल.

तू काढलेल्या रांगोळीचा फोटो आम्हाला पाठव **9172136478**

कापडाचा प्रवास

गोष्ट - जुई चितळे



रेवाच्या मावशीने रेवासाठी सुंदर कापड आणलं. त्यावर फुलाफुलांची नक्षी होती.

रेवाला ते कापड खूप खूप आवडलं. ती आईला म्हणाली, "मला याचा छान फ्रॉक शिवायचा." रेवा आणि आई कापड घेऊन टेलर मावशींकडे गेल्या. त्यांनी रेवाचं टेपने माप घेतलं तेंव्हा रेवाला गंमत वाटली.

नवीन फ्रॉक शिवून झाल्यावर तो घालून रेवाने आरशात बघितलं. गिरकी घेत ती म्हणाली, "कित्ती छान आहे हा फ्रॉक!"

कुठेही बाहेर जाताना रेवाला वाटायचं की तोच फ्रॉक घालावा. वापरून वापरून फ्रॉक हळू-हळू जुना पण मऊ होऊन गेला. मग रेवा घरात तो घालायला लागली.




हळूहळू रेवा थोडी उंच झाली. आता तो फ्रॉक तिला छोटा व्हायला लागला.

पण तरीही तोच तिचा सगळ्यात आवडता फ्रॉक होता. तिला तो टाकून द्यायचा नव्हता आणि कोणाला देऊनसुद्धा टाकायचा नव्हता.

मग रेवाच्या मावशीला एक मस्त कल्पना सुचली. "रेवा, आपण फ्रॉक वापरून एक छानशी उशी तयार करू या का?"

रेवाला आयडिया आवडली. तिला बदामाच्या आकाराची उशी हवी होती. हवं तसं बदामाचं चित्र रेवाने कागदावर काढलं.



तसा आकार फ्रॉकच्या खालच्या भागावर आईने काढून दिला. आणि कापून घेतला. तशा आकाराचा अजून एक तुकडा त्यांनी कापून घेतला. दोन्ही तुकडे एकावर एक ठेवून कडेने धावदोरा घालून घेतला. रेवाने सुद्धा एक बाजू शिवली.

चित्र - ओंकार महामुनी



उशीमध्ये चिंध्या भरायला थोडी जागा न शिवता तशीच ठेवली. त्यातून ही उशी पूर्ण उलट करून घेतली. म्हणजे आतली बाजू बाहेर आली.

रेवा आणि मावशीने मिळून आणखी काही जुन्या कपड्यांच्या चिंध्या करून त्या आत भरून टाकल्या. शेवटची उघडी बाजू शिवून बंद केली. मऊ मऊ, गुबगुबीत उशी तयार झाली. रेवा तिची ही आवडती उशी घेऊनच रोज झोपू लागली.

तू पण तुझ्या जुन्या कपड्यांपासून अशी एखादी उशी तयार कर.


कापसाचं शेत कधी तू पाहिलं आहेस? कापसाच्या झाडांना कापसाची बोंडं येतात. त्यातला कापूस काढून, स्वच्छ करून लांब पेळू तयार करतात. त्यापासून बारीक आणि लांबच लांब सूत म्हणजे धागे तयार करतात. या धाग्याचं विणून तयार होतं कापड. कापड वेगवेगळ्या रंगांनी रंगवलं जातं. कापडापासून पुढे काय काय होतं ते तू गोष्ट वाचून सांग.


मे महिन्यात चिकू पिकूच्या एका कार्यशाळेत आभा भागवत यांनी ही ॲक्टिव्हिटी घेतली होती. या कार्यशाळेत मुलांनी जुने कपडे वापरून त्यांच्या आवडीची सॉफ्ट टॉईज बनवली.



शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्ता

आपल्या हातात जादू आहे. हातांनी भरपूर वेगवेगळ्या वस्तू करून बघायला हव्यात. शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्तेमुळेच अवयवांचा सफाईदार वापर आपण शिकतो. स्वतःच्या हातांनी बनवलेल्या वस्तूविषयी वेगळीच जवळीक वाटते. त्याचा अनुभव नक्की घ्यायला हवा.





जंगल सफारी
वाघाच्या गुहेत ३ टर्न थांबावं लागेल.
पुलावरून थेट २९ वर पोहोच
दरड कोसळली. २ टर्न इथेच थांब
साप चावेल, पटकन वेलीवरून उतर
रस्ता तुटला आहे. ६ पावलं मागे जावं लागेल.
Winner!
जिराफाच्या मानेवरून घसरून पुन्हा मागे ६ वर जा.
बिळातला शॉर्टकट सापडला !!
बांबूला अडखळून पडल्याने २ पावलं मागे जा
सशाबरोबर उडी मारत ३ पावलं पुढे जा
Start
उंच गवतात रस्ता हरवला. १ टर्न इथेच थांब

छबी आणि बागुलबुवा

गोष्ट - वैशाली कार्लेकर

छबी ही तुमच्यासारखीच एक मुलगी आहे आणि बागुलबुवा आजोबा तिचा खास मित्र आहे. बागुलबुवाकडे जादूची पिशवी आहे. छबीला सापडलेल्या निळ्या दगडाच्या जादूने छबी आणि बागुलबुवा नीलग्रहावर गेले होते. नीलग्रह पृथ्वीच्या अगदी जवळ आहे. नीलग्रहावर छोटे छोटे निळे गट्टू राहतात. नीलग्रहावर बरेच दिवस राहून त्यांनी धमाल मस्ती केली. पण आता परत पृथ्वीवर यायची वेळ झाली होती.



जेव्हा इंद्रधनुष्य पडेल तेव्हाच नीलग्रहावरून पृथ्वीवर येता येतं. इंद्रधनुष्यावरून घसरत...

छबीने परत जायची सगळी तयारी केली होती. गट्टूंनी छबी आणि बागुलबुवासाठी भेटवस्तू आणल्या होत्या. कोणी रंगीत दगड आणले होते, कोणी पांढरी-पांढरी झाडाची पानं आणली होती, कुणी तळ्यातली चमचमणारी वाळू आणली होती. छबी आणि बागुलबुवा इंद्रधनुष्याची वाट बघत होते. तेवढ्यात आकाशात गडद सप्तरंगी इंद्रधनुष्य दिसायला लागलं. बागुलबुवा म्हणाला, **''छबी, चल निघू या.''** मग सगळ्यांनी मिळून छबी आणि बागुलबुवासाठी एक छान गाणं म्हणत सुंदर नाच केला.

तो बघून छबीला खूप हसायला आलं. बागुलबुवाचा हात धरून 'जंतर-मंतर' जादूचा मंत्र म्हणत निळा दगड हातात धरून बागुलबुवा आणि छबी दोघांनी इंद्रधनुष्यावर उडी मारली.



इंद्रधनुष्य खूपच मोठं होतं. त्यावरून झुपकन घसरत पुढेपुढे जाताना मजा येत होती. पण तेवढ्यात अचानक गडगडाट ऐकू यायला लागला. ऊन कमी होऊन काळोखी आली. अचानक एक मोठा ढग आला आणि त्याबरोबर इंद्रधनुष्यही गायब झालं. अरे बापरे! छबी आणि बागुलबुवा आकाशात अधांतरी तरंगायला लागले.

''बागुलबुवा, आता काय करायचं? तुझा 'जंतर-मंतर' मंत्र पण चालत नाहीये!'' छबीला घाबरून रडू यायला लागलं.

तेवढ्यात बागुलबुवाने छबीचा हात धरून त्या काळ्या ढगावरच उडी मारली.

''आहा!'' मऊ कापसासारख्या त्या ढगात छबीला एकदम मज्जा वाटली.

''घाबरू नको, हात नीट धर हं! मंत्र चालत नसल्यामुळे आता आपल्याला या ढगावरूनच पुढे जायला लागेल.'' बागुलबुवा म्हणाला.

आजूबाजूला असेच पांढरे-काळे बरेच ढग तरंगत होते. छबीचा ढग जोरात पुढे जात होता.

चित्र - ओंकार मरकळे

थोड्या वेळाने तो ढग पृथ्वीच्या जवळ आला. खाली समुद्र दिसत होता. समुद्राचं पाणी चमकत होतं. खूप जहाजं आणि होड्या दिसत होत्या. ते बघून छबीला खूप छान वाटलं.

''पण आपण खाली कसं उतरायचं?'' तिला प्रश्न पडला.

''बघू काहीतरी युक्ती सुचेल.'' बागुलबुवा म्हणाला.

थोड्या वेळाने एकदम गार वारा वाहायला लागला. ढग जोरजोरात हलायला लागला.

बागुलबुवा म्हणाला, **''बहुतेक पाऊस पडेल. मग आपण पावसाबरोबर हळूच खाली होडीत उतरू.''** आणि तसंच झालं. ढगातून पाण्याचे थेंब पडायला लागले आणि ढगातला कापूस कमी व्हायला लागला. बागुलबुवाने छबीचा हात घट्ट धरला. थोड्याच वेळात ते दोघं पावसाच्या धारांबरोबर खाली यायला लागले. आणि अलगद खाली असलेल्या एका होडीत उतरले.



''हुश्श! आलो बुवा.'' छबी अगदी आनंदाने म्हणाली.


''आलो कुठले, अजून घरी पोचायचं आहे.'' बागुलबुवा म्हणाला.

होडीवाल्या दादांची होडी हळूहळू किनाऱ्याकडे निघाली. लाटांवर डुलत–डुलत दोघे शेवटी एकदा जमिनीवर पोहोचले. निळ्या–निळ्या समुद्राकडे पाहत छबी म्हणाली, **''आपली पृथ्वीपण नीलग्रहाची निळी ताईच आहे!''** जमिनीवर आल्यावर बागुलबुवाच्या मंत्राची जादू परत आली आणि दोघे लगेच घरी पोचले.

''आई, आजी, मी आले गं!''
असं म्हणत छबी घरात धावत गेली.

''आलीस का गं छबे'' असं म्हणत दोघींनीही छबीला जवळ घेतलं.

बागुलबुवा हे बघत हसत होता.



भाषिक - वाचिक बुद्धिमत्ता

पहिल्या ५ वर्षात भाषाविकास प्रचंड वेगाने होत असतो. घरात, शाळेत काही ठराविक शब्दच मुलांच्या कानावर पडतात. गोष्टींमधून मुलांचा शब्दसाठा वाढतो. गोष्टी ऐकून, सांगून मुलांची भाषिक बुद्धिमत्ता विकसित होऊ शकते. मुलांना स्वतःचे विचार, कल्पना मांडता येण्यासाठी भाषाविकास होणं गरजेचं आहे.





इथे मी एक झाड आणि त्याच्या फांद्या काढल्या आहेत. फुलांची देठं आहेत, पण फुलं अजून उमलायची आहेत. तुझ्या आवडत्या रंगाच्या कागदाची छोटी-छोटी फुलं कापून देठांना चिकटव. म्हणजे बहरलेलं सुंदर झाड दिसेल. झाडाच्या खोडावर रेघारेघांची नक्षी काढ आणि झाडामागे काय दिसलेलं तुला आवडेल त्याचं चित्र काढ.

- आभा भागवत

पालकांसाठी

मुलांना चित्र काढण्याबरोबर कात्रीने काहीतरी कापून चिकटवायला आवडतं. हवी तशी फुलं मुलांना कापून चिकटवायला प्रोत्साहन द्या. हे चित्र मोठ्या आकारात तुम्ही मुलांबरोबर मिळून काढा.

तू रंगवलेल्या चित्राचा फोटो आम्हाला पाठव 9172136478

खेळण्यांचं पुढे काय होतं?

गोष्ट - सोनाली फडके





आईने मिनूला एक खेळणं विकत घेतलं - रिमोटची गाडी! खेळण्याच्या खोक्यावरची माहिती बाबाने वाचून दाखवली. खेळण्यात सेल घातले. रिमोटचं बटण दाबून गाडी झूमझूम पळायला लागली.



मिनू गाडीशी खूप खूप खेळली. मित्रांना खेळायला दिली. एकदा खेळताना गाडीचं चाक तुटलं. मिनूने आता गाडीशी खेळणं सोडून दिलं.



खूप दिवस गाडी पडून होती.
शेवटी खेळणं कचरा पेटीत टाकून दिलं.
पुढे त्या खेळण्याचं काय बरं झालं असेल?



तुझी खेळणी कशा-कशापासून बनलेली असतात सांग?
प्लास्टिक, मेटल/धातू, लाकूड, बॅटरी.
बऱ्याचदा असा कचरा जमिनीत मोठा खड्डा करून पुरून टाकतात.




हा आपला कचरा आहे तो असा पृथ्वीला देऊन टाकायचा का?

मग काय बरं करता येईल?





तुला जी खेळणी नको आहेत ती बाजूला काढ. त्यातली प्लॅस्टिकची, मेटलची, लाकडाची खेळणी वेगवेगळी करून नीट भरून ठेव.



भंगारवाला किंवा स्क्रॅप सेंटरमध्ये ती दे. तिथून ती रिसायकलिंग सेंटरला जातात. त्या वस्तू वितळून त्यापासून वेगळी वस्तू तयार करतात.





मिनूने तुटलेली गाडी कचरा पेटीत टाकली नाही. तिने न लागणारी खेळणी एका स्क्रॅप सेंटरमध्ये दिली. तिथे तिची प्लॅस्टिकची खेळणी वितळवून त्यापासून एक डब्बा तयार झाला.

हा डब्बा वापरून खराब झाल्यावर त्याचं काय बरं होईल?

चित्र - ऋतुजा सिद्दम

पालकांसाठी

वस्तू ते कचरा हा प्रवास समजून घेऊन आपण जो कचरा करतो त्याची जबाबदारी घ्यायला हवी. खेळण्यांच्या या प्रवासाविषयी मुलांशी आवर्जून बोलू या. कुठलीही टाकलेली वस्तू परिसंस्थेत (ecosystem) फिरत रहायला हवी. वस्तू, कचरा, कचऱ्यात काम करणारे लोक यासगळ्यांचा आदर करायला शिकू या.

जादूचा रूलाम

गोष्ट - मृदुला इंगळे

चंगू आणि चिंगी सबने राबामतीला निघाले. त्यांची वामशी रहात होती तिकडे. पण पग्गा मारता–मारता ते कुचीच्या सबमध्ये बसले. रजा वेळ लेग्यावर त्यांच्या लक्षात आलं की ते लोसापूरच्या सबमध्ये बसले आहेत. ते सुद्धा किटिट काढताना डंककटरला ''दोन राबामतीची किटिटं द्या'' म्हटल्यावर जेव्हा डंककटरने सांगितलं तेव्हा त्यांच्या लक्षात आलं.

''आता काय रकायचं?''



चित्र - भक्ती दलाल

चिंगीचा मामा लोसापूरला राहातो त्यामुळे त्यांनी तिकडेच जायचं रठवलं. दोन लोसापूरची किटिटं काढली. पण मग राबामतीची वामशी टाव बघेल नं! तिला कळवायला हवं. चंगूने खिशातून जादूचा रूलाम काढला, त्यावर निरोप लिहीला आणि रूलामाला दिलं पाठवून वामशीकडे.

जादूचा रूलाम गेला मस्त उडत–उडत राबामतीला, वामशीला निरोप देऊन रूलाम परत आला. किडखीतून मागे मागे पळणारी डाझं घबत चिंगी आणि चंगू लोसापूरला पोचले.

उलट शब्दातली गोष्ट कशी वाटली? तूसुद्धा एखादी उलट–सुलट गोष्ट लिहून आम्हाला पाठव.

Science सैर

गोष्ट - शिवानी पेठे



छोट्या ऑलला त्याची आई शोधत होती. खूप शोधल्यावर आईला तो कोंबड्यांच्या खुराड्यात सापडला. आईने वाकून बघितलं तर काय? तो चक्क अंड्यांवर बसला होता.

आईने विचारलं,

"तू हे काय करतो आहेस ऑल?"

ऑल म्हणाला,

"अशी अंडी उबवली की त्यातून कोंबडीचं पिल्लू येतं ना? मी अंड्याना उब देतोय"

हे ऐकून आईला गंमतच वाटली. ऑलची आई त्याची शाळा घरीच घ्यायची. घरच्याघरी असलेल्या सामानातून वेगवेगळे प्रयोग करायला ऑलला आवडायचं. बरीच वर्षे गेली. ऑल आता जरा मोठा झाला होता. तो ट्रेनमध्ये पेपर्स विकायचा. त्यातून मिळणारे पैसे वापरून तो नवीन प्रयोग करून बघायचा.

एकदा पेपर विकून झाल्यावर ऑल आगगाडीत इकडून-तिकडे फिरत होता. आगगाडीच्या एका डब्याचं दार उघडून त्याने आत वाकून पाहिलं. तिथे कोणीच नव्हतं. तो आगगाडीतला गार्डचा डबा होता. ऑलच्या लक्षात आलं की या डब्यात कोणीच येत नाही. ऑलने मग एक आयडिया केली.

दुसऱ्या दिवशी तो आगगाडीत टेबल घेऊन चढला. गार्डच्या डब्यात त्याने ते टेबल ठेवलं. पेपर्स विकून झाल्यावर हळूच तो गार्डच्या डब्यात शिरला. बरोबर आणलेल्या सामानातून तिथेच त्याने एक छोटा प्रयोग करून बघितला. हळू हळू त्याने या डब्यात प्रयोगाचं सामान जमा केलं. वर्तमानपत्र विकून झाली की गार्डच्या डब्यात शिरून तो प्रयोग करायला लागला. ऑलने गार्डच्या डब्यात त्याची प्रयोगशाळाच तयार केली.

आगगाडीतली प्रयोगशाळा!

पण एक दिवस गडबड झाली. ऑल ट्रेनमध्ये काहीतरी प्रयोग करून बघत होता. अचानक ट्रेन जोरात हलली. प्रयोगातली काही रसायनं खाली पडली आणि ट्रेनमध्ये आग लागली. स्टेशन ऑफिसर खूप चिडला आणि ऑलला ओरडला.

''परत ट्रेनवर प्रयोग करताना दिसलास तर कधीच ट्रेनमध्ये चढू देणार नाही''

ऑलला खूप वाईट वाटलं. त्याची प्रयोगशाळा पण बंद झाली.

असेच काही दिवस गेले. एके दिवशी ऑल वर्तमानपत्र घेऊन प्लॅटफॉर्मवर आगगाडीची वाट बघत होता. तितक्यात एक लहान मुलगा त्याला रुळांवर जाताना दिसला. रुळांवर ट्रेन नाही याची खात्री करून ऑल रुळांवर उतरला आणि त्या लहान मुलाला घेऊन प्लॅटफॉर्मवर आला.



चित्रं - अंबिका करंदीकर



तो लहान मुलगा स्टेशन मास्टरचा मुलगा होता. स्टेशन मास्टरने ऑलचे आभार मानले. त्याच्या लक्षात आलं की ऑल चांगला मुलगा आहे. आपल्यामुळे ऑलची प्रयोगशाळा बंद झाली याचं स्टेशन मास्टरला वाईट वाटलं. पण ट्रेनमध्ये प्रयोग करणं धोक्याचं होतं. त्याने ऑलला स्टेशनवरची, स्टेशन मास्टरची खोली प्रयोगशाळा तयार करायला म्हणून दिली. ऑलचे प्रयोग सुरु झाले. स्वतःचे प्रयोग करता-करता ऑल ट्रेनबद्दलही खूप काही वाचू लागला.



हा ऑल म्हणजेच प्रसिद्ध शास्त्रज्ञ

थॉमस अल्वा एडिसन.

मोठा होऊन एडिसन टेलिग्राफिक इंजिनीअर झाला. प्रयोग करून बघण्याची जिद्द त्याने कधीच सोडली नाही. या जिद्दीतून त्याने विजेच्या दिव्याचा/ बल्बचा शोध लावला.





व्यक्तिअन्तर्गत बुद्धिमत्ता

स्वतः विचार करून, स्वतःशी संवाद साधून, निरनिराळे प्रयोग करून बघणे या बुद्धिमत्तेमुळे साध्य होते. आपलं सभोवताल विज्ञानाने व्यापलेलं आहे. मुलांपर्यंत हा विचार पोहोचण्यासाठी Science सैर हे सदर आहे.



हॅलो, मी ब्रेनी










"Multiple intelligences" म्हणजेच बहुरंगी बुद्धिमत्ता! प्रत्येकाच्या मेंदूत ८ प्रकारच्या बुद्धिमत्ता असतात. काही बुद्धिमत्ता ठळक तर काही फिकट असतात.

परिक्षेत जास्त गुण मिळाले तरच मूल हुशार हा सर्वसाधारण निष्कर्ष चुकीचा असू शकतो. ज्या बुद्धिमत्तेमध्ये आपला कल जास्त असतो त्यात आपण हुशार असतो. लता मंगेशकर यांची संगीतविषयक बुद्धिमत्ता ठळक होती म्हणून संगीत क्षेत्रात त्या हुशार ठरल्या. तसंच डॉ. सलीम अली यांचा कल निसर्गविषयक बुद्धीमत्तेकडे होता आणि म्हणूनच ते पक्षीतज्ज्ञ झाले. मुलांना आणि पालकांना या वेगवेगळ्या बुद्धिमत्तांची ओळख होणं महत्त्वाचं आहे म्हणूनच चिकूपिकूच्या अंकांमधून या ८ बुद्धिमत्तांचे अनुभव देण्याचा प्रयत्न आम्ही करतो.









मोजू या नाचू या, लिहू या.

एक दोन दोन तीन
येतील आज मैत्रिणी नवीन

तीन चार चार पाच
आज बसवणार मोराचा नाच

चार पाच पाच सहा
नाचतो मस्त तुम्ही पहा


सात आठ आठ नऊ
दमलो आता खाणार खाऊ

नऊ आणि नऊ दहा
पळा घरी वाजले सहा

दहा अकरा दहा अकरा...

....

पुढची ओळ तू पूर्ण कर



कविता - विद्याधर शुक्ल | चित्र - भक्ती दलाल

चॉकलेटची जर्नी

- डॉ. विदुला म्हैसकर | चित्र- योगिता धोटे

तुला चॉकलेट खायला आवडतं नं? पण माझा जन्म कुठे होतो माहितीये तुला? तू मला दुकानातून आणतोस पण मी तयार होतो हिमाचल प्रदेशातल्या बडी (बद्दी) गावातल्या एका फॅक्टरीत.



चॉकलेट बनवण्यासाठी लागणारं कोको आफ्रिकेतून विमानाने येतं.


आणि दूध टँकरने हरियाणातल्या चंडीगड शहरातून येतं.

साखर मोठ्या ट्रकने पंजाबमधल्या अमृतसरमधून येते.

हिमाचल प्रदेशातल्या 'बडी' शहरातल्या कारखान्यात सगळे पदार्थ जमा होतात. कारखान्यातल्या मोठ्या-मोठ्या यंत्रामध्ये हे पदार्थ एकत्र केले जातात. आणि आम्ही चॉकलेट्स तयार होतो. त्यानंतर मोठ्या-मोठ्या खोक्यांमध्ये आम्हाला भरतात.



मग माल–वाहक आगगाडीत खोकी भरून हिमाचलमधून आम्ही महाराष्ट्रातल्या मुंबई शहरात येतो. तिथे आमचं मोठं गोडाऊन आहे.




आगगाडीतून उतरून ट्रकने आम्ही गोडाऊनमध्ये येतो. तिथून टेम्पोने आम्ही वेगवेगळ्या शहरातल्या / गावातल्या दुकानात जातो.



दुकानातून तू मला खरेदी करतोस आणि मग मी तुझ्या पिशवीत बसून तुझ्या घरी येतो.



असा मोठा प्रवास करून मी तुझ्यापर्यंत पोहोचतो.



शेजारच्या नकाशात तुझ्या घरापर्यंतचा माझा प्रवास कसा–कसा होतो ते जोडून दाखव.

तुझ्या घरातल्या या गोष्टी कुठल्या गावातून/शहरातून तुझ्यापर्यंत पोहोचल्या ते शोधून लिही.

साबण –

टूथपेस्ट –

पालकांसाठी

आपल्या घरातली प्रत्येक वस्तू ही कुठेतरी तयार झालेली असते. वस्तूच्या मागे तिचा manufacturing address दिलेला असतो. टूथपेस्ट, साबण, दूध, खेळणी नक्की कुठे तयार झाली हे मुलांबरोबर शोधून काढा.

इंदूचा पेटारा

चित्र - आदिती गुणाजी

इंदूकडे एक जादूचा पेटारा आहे. त्यात खूप.. खूप.. अगदी भरपूर वस्तू आहेत. कोणतीही हवी असलेली वस्तू त्या पेटाऱ्यात नक्की सापडते. या दिवाळीच्या सुट्टीत इंदू आणि तिच्या घरचे सगळे तिच्या आत्याकडे जायला निघाले आहेत.



रेल्वेगाडीतून रात्रभर प्रवास करून गेल्यावर आत्याचं घर येतं. त्याचीच तयारी घरात चालू आहे. त्यांना प्रवासात लागणाऱ्या काही वस्तू तू त्यांना शोधून देशील का? कोणती वस्तू लागेल ते ओळख आणि पेटाऱ्यात आहे का ते बघ.

इंदूच्या अप्पांची मोठी बॅग भरून झाली. रात्रीच्या वेळी प्रवासात बॅगेतून कोणी काही चोरून नेऊ नये म्हणून काय करता येईल असा विचार ते करत आहेत. तू सांग बॅगेला काय लावता येईल? पेटाऱ्यात आहे का बघून सांग.

____



(किल्ली - कुलूप)

इंदूची पाटीमा म्हणजे आज्जी तातांना रात्री खोकला आला तर खडीसाखर देते. पण गाडीत अंधार असेल तर पिशवीतून बरोब्बर खडीसाखर कशी शोधून देता येईल? उजेड पाडणारी एखादी वस्तू दिसतेय का बघून सांग.

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _

(टॉर्च)





इंदूच्या तातांना म्हणजे आजोबांना रात्री मधेच उठून पाणी प्यायची सवय आहे. रेल्वेगाडीत असताना ते कशातून पाणी पिऊ शकतील? त्यांनी बरोबर न्यावी अशी कोणती वस्तू तू शोधून देशील?

_ _ _ _ _ _ _ _ _

(पाण्याची बाटली)



इंदूची अम्मा सामान अजून भरत आहे. सकाळी उठल्यावर आवरण्याचा वस्तू तिने ठेवल्या – ब्रश, पेस्ट, कंगवा, पिना ... पण नीट आवरून झालंय की नाही हे कशात बघणार? तू सांग आणि पेटाऱ्यात शोध.

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

(आरसा)

इंदूला प्रवासात कंटाळा आला तर खेळायला काहीतरी जवळ असावं असं वाटतंय. पेटाऱ्यात अशा कोणकोणत्या वस्तू आहेत शोधून दाखव.

_ _ _ _ _ _ _

(बॉल, पत्ते, सापशिडीचा पट, फासे, सोंगट्या)



गणितविषयक बुद्धिमत्ता

तर्क/लॉजिक रोजच्या जगण्याचा महत्त्वाचा भाग आहे. यासारख्या सोप्या ॲक्टिव्हिटीज मधून गणित-तार्किक बुद्धिमत्तेचे अनुभव मुलांपर्यंत पोहोचवता येतील.

हातांची जादू

- डॉ. विदुला म्हैसकर

आजीच्या गावाला जाऊ या!

चिंगी दिवाळीच्या सुट्टीला चाललीये तिच्या आजीकडे. चिंगी राहते शहरात आणि आजी राहते गावात. तिचा हा प्रवास दाखवणारं एक खेळणं आपण बनवू या. यासाठी सोबत दिलेला सफरीचा कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, कात्री, डिंक, चिकटपट्टी आणि ट्रान्सपरन्सी/प्लास्टिकचा तुकडा (8"x 2.5") लागेल.

1



सफरीचं चित्र रंगवून घे. वाटेतलं जंगल, देऊळ, शेत, जाहिरातीच्या बोर्डवर बसून पक्षी काय करतोय? झाडावरचा साप, शेतातलं बुजगावणं, झाडाला लटकवलेलं टायर.. सगळं नीट बघ आणि रंगव. चिंगीला सकाळी निघायचं आहे आणि आजीकडे पोहोचेपर्यंत रात्र होणार आहे. तसंच आकाश रंगव

2



आता या कागदाचा दंडगोल कर आणि डावीकडे जी चॉकलेटी रंगाची पट्टी आहे त्यावर उभी डिंक चिकटपट्टी लावून तो पक्का कर.

3



सोबत दिलेले गाडीचं चित्र कापून घे. गाडीत चिंगी बसलीये बरं का! ट्रान्सपरन्सीच्या तुकड्यावर गाडीचं चित्र सेलोटेपने पूर्ण चपखल चिकटव.

4



आता ट्रान्सपरन्सी कागदाच्या दंडगोलावर सैलसर गुंडाळ आणि चिकटपट्टीने ट्रान्सपरन्सीचा दंडगोल पक्का कर. ट्रान्सपरन्सीचा दंडगोल कागदाच्या दंडगोलावर सहज गोल-गोल फिरला पाहिले.


5



आता चिंगी आजीकडे जायला तयार आहे! गाडीचे चित्रं खाली मैलाच्या दगडाजवळ आण आणि चिंगीला टाटा करून निघ प्रवासाला. एका हाताने ट्रान्सपरन्सी धर आणि गाडी हळू-हळू रस्त्यावरून पुढे जाताना दिसेल असा कागदाचा दंडगोल गोल गोल फिरव. शहर, नदी, डोंगर, जंगल, देऊळ, शेत पार करून चिंगीला आजीकडे पोहोचव.

हयाच प्रकारे वेगळी चित्रं काढून तुला अजून कुठला प्रवास दाखवता येईल बरं? तू काढलेल्या प्रवासाचं चित्रं आम्हाला पाठव.

Scan this QR code to watch the process video.



RNI TC NO.: MAHBIL/2019/78568, Declaration No.: SDM/Haveli/SR/59/2019
Date of Publication: 03/10/2022